# महाराष्ट्र जीवन प्राधिकरण

४ था मजला, एक्सप्रेस टॉवर्स, नरिमन पॉईट, मुंबई- ४०० ०२१
दूरध्वनी : ०२२ -२२०२६२४९, २२८३५२४७ व २२०२५३५४(थेट)
फॅक्स : २२८२१२६१

जा.क्र.मजीप्रा/मलोआ/सकाअ/नियुक्ती/२००८/आ-१ दिनांक :-२८.१०.२०१६

महाराष्ट्र अभियांत्रिकी (स्थापत्य) सेवा,गट-अ (मुख्य) परीक्षा २०१३ सहाय्यक अभियंता श्रेणी-१ (गट-अ) (स्थापत्य) या पदावर सरळ सेवेवरील नियुक्त्या.

## // कार्यालयीन आदेश //

वाचा :- १) महाराष्ट्र लोकसेवा आयोग मुंबई, यांचे दिनांक २८ एप्रिल,२०१६ रोजीचे पत्र.
२) महाराष्ट्र शासन, पाणी पुरवठा स्वच्छता विभाग, मुंबई यांचेकडील पत्र क्रमांक मजीप्रा-२०१०/प्र.क्र.२९०/पापु-२३/ दिनांक ३१ मे, २०१६

महाराष्ट्र अभियांत्रिकी (स्थापत्य) सेवा, गट-अ परिक्षा २०१३ सहायक अभियंता श्रेणी-१, गट-अ (स्थापत्य) या पदावरील नियुक्तीसाठी सरळसेवा भरतीद्वारे घेण्यात आलेल्या एकत्रित स्पर्धात्मक परिक्षेच्या निकालावर आधारित महाराष्ट्र लोकसेवा आयोग,मुंबई यांच्या संदर्भित दिनांक २८ एप्रिल,२०१६ च्या पत्रान्वये, सहायक अभियंता श्रेणी-१, गट-अ (स्थापत्य) पदावर नियुक्तीसाठी शिफारसप्राप्त २६ उमेदवारांपैकी खालील विवरणपत्रातील सद्यस्थितीत नियुक्तीस पात्र ठरलेले उमेदवार महाराष्ट्र जीवन प्राधिकरणामध्ये ते रुजू होतील त्या दिनांकापासून त्यांच्या नावासमोर दर्शविलेल्या प्रवर्गामध्ये दोन वर्षांच्या परिविक्षाधीन कालावधीसाठी सहायक अभियंता श्रेणी-१, गट-अ (स्थापत्य) म्हणून रुपये १५६००-३९१०० + ग्रेड पे रु.५४०० या वेतनश्रेणीत त्यांच्या नावासमोरील स्तंभ-७ मध्ये दर्शविलेल्या कार्यालयात तात्पुरती नियुक्ती देण्यात येत आहे.

| अ. क्र. | म.लो. आ. यादीतील क्रमांक | उमेदवारांचे नांव | जातीचा प्रवर्ग | नियुक्तीचा प्रवर्ग | महसुल विभाग | प्रस्तावित पदस्थापनेचे कार्यालय |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | श्री.अर्जुन मारुती गोळे | खुला | खुला | नागपूर | ग्रामिण पाणी पुरवठा उपविभाग, अहेरी, जि.प., गडचिरोली (प्रतिनियुक्ती) |
| २ | ३ | श्री.गौरव तात्यासाहेब देवकर | खुला | खुला | अमरावती | ग्रामिण पाणी पुरवठा उपविभाग, अंजनगांव, जि.प., अमरावती (प्रतिनियुक्ती) |
| ३ | ४ | श्री. उमल लक्ष्मण चांदेकर | खुला | खुला | औरंगाबाद | महाराष्ट्र जीवन प्राधिकरण उपविभाग क्र.1, औरंगाबाद |
| ४ | ६ | श्री.प्रशांत जयसिंग पाटील | खुला | खुला | नाशिक | ग्रामिण पाणी पुरवठा उपविभाग, एरंडोल, जि.प., जळगांव (प्रतिनियुक्ती) |

२. सहाय्यक अभियंता श्रेणी-१, गट-अ (स्थापत्य) मधील उमेदवारांची नियुक्ती ही दोन वर्षाचा परिविक्षाकाळ समाधानकारकरित्या पूर्ण करण्याच्या व खालील विहित शर्तीच्या पुर्ततेच्या अधीन राहिल.

अ) उमेदवारांनी नियुक्तीचे आदेश प्राप्त झाल्याच्या दिनांकापासून एक महिन्याच्या आत त्यांच्या नेमणूकीच्या ठिकाणी रुजू झाले पाहिजे. अन्यथा एक महिन्यानंतर सदर नियुक्तीचे आदेश आपोआप रद्द होतील. कार्यालय प्रमुखांनी एक महिन्यानंतर रुजू होणाऱ्या अभियंत्यास रुजू करुन घेवू नये.

ब) विहित कालावधीत अपरिहार्य, उचित कारणास्तव त्यांना रुजू होण्यासाठी मुदतवाढ हवी असल्यास उमेदवारांनी हा आदेश निर्गमित झाल्याच्या दिनांकापासून ३० दिवसांच्या आत अर्ज सादर करावा. नियुक्तीच्या आदेशानुसार एक महिन्याच्या आत सेवेत रुजू न होणाऱ्या उमेदवारांना सेवा ज्येष्ठता गमवावी लागेल. त्यांची ज्येष्ठता ते ज्या दिनांकास महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या सेवेत रुजू होतील, त्या दिनांकास निश्चित करण्यात येईल. उचित कारणास्तव मुदतवाढ देण्याचा निर्णय महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचा राहिल. विहित मुदतीत महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या सेवेत रुजू न होणाऱ्या उमेदवारांच्या नियुक्तीचे आदेश आपोआप रद्द होतील.

क) मध्यवर्ती कार्यालयाने वरील उमेदवारांना दिलेल्या पदस्थापनेत प्रादेशिक विभागाच्या स्तरावरुन कोणताही बदल करण्यात येवू नये अन्यथा संबंधितांविरुध्द कडक कारवाई करण्यात येईल.

३. सहाय्यक अभियंता श्रेणी-१, गट-अ (स्थापत्य) मध्ये नियुक्ती करणेत आलेल्या उमेदवारांना महाराष्ट्र जीवन प्राधिकरणा बाहेरील शासकीय/ निमशासकीय कार्यालयात प्रतिनियुक्ती दिल्यास, ती स्विकारणे बंधनकारक राहिल.

४. वरील उमेदवाराने हिंदी व मराठी भाषा परीक्षा अगोदरच उत्तीर्ण केली नसेल किंवा त्यांना भाषा परिक्षा उत्तीर्ण होण्यापासून सूट मिळाली नसेल तर यासंबंधी असलेल्या नियमानुसार भाषा परीक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक आहे.

५. वरील उमेदवारांनी शासनाने विहित केलेली संगणक परिक्षा अगोदरच उत्तीर्ण केली नसेल तर शासनाने विहित केलेली संगणक परीक्षा या संबंधी असलेल्या नियमानुसार उत्तीर्ण करावी लागेल.

६. वरील उमेदवारांची सेवेत रुजू झाल्यानंतर सेवेचा राजीनामा देऊ इच्छित असल्यास, त्यांना शासन परिपत्रक सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक एसआरव्ही १०९२/१०३३/प्र. क्र.३३/९२/८, दिनांक २/१२/९७ मधील तरतुदीनुसार महाराष्ट्र जीवन प्राधिकरणास किमान १ (एक) महिन्याची आगाऊ नोटीस किंवा एक महिन्याचे वेतन देणे आवश्यक राहील. मात्र, गैरशिस्त, सेवानियमांचा भंग इत्यादी कारणांसाठी एखाद्या उमेदवाराची सेवा समाप्त करण्यासाठी वरील प्रमाणे उमेदवारास नोटीस देण्याचे बंधन महाराष्ट्र जीवन प्राधिकरणावर राहणार नाही.

७. वरील उमेदवारांनी महाराष्ट्र राज्य प्रशिक्षण धोरणासंबंधी, सामान्य प्रशासन विभागाच्या शासन निर्णय क्रमांक:टीआरएन-०९/प्र.क्र.३९/०९/१२-अ, दि.२३ सप्टेंबर,२०११ मधील परिच्छेद सहा येथील तरतुदीनुसार प्रशिक्षण सुरु होण्यापूर्वी प्रशिक्षणार्थीने सक्षम प्राधिकाऱ्यास परिशिष्ट-ब येथे नमूद बंधपत्र लिहून द्यावे लागेल. त्याचप्रमाणे जर एखादा प्रशिक्षणार्थी त्यांच्या परिवीक्षाधीन कालावधीत नोकरी सोडत असेल तर प्रशिक्षणावर खर्च झालेली रक्कम प्रशिक्षणार्थीकडून वसूल करण्यात येईल. त्यानुसार प्रत्येक प्रशिक्षणार्थीला संचालक (प्रशासन) तथा अधीक्षक अभियंता, मित्रा, नाशिकरोड यांना व संबंधित नियुक्ती प्राधिकाऱ्यांकडे सोबत जोडलेले बंधपत्र भरुन सादर करणे बंधनकारक राहील.

८.  संबंधित कार्यालय प्रमुख यांनी त्यांचे कार्यालयात रुजु होण्यासाठी येणा-या उमेदवाराचे सर्व संबंधित मुळ प्रमाणपत्रे तपासून खात्री करावी व मगच उमेदवारांना नियुक्तीच्या ठिकाणी रुजु करुन घ्यावे व त्यांचा रुजू झाल्याचा दिनांकाचा अहवाल मध्यवर्ती कार्यालयास तात्काळ सादर करावा.

९.  वरील उमेदवार ३० दिवसांच्या मुदतीत/विहित कालावधीत रुजू न झाल्याबाबतचा अहवाल संबंधित मुख्य अभियंता/अधीक्षक अभियंता/ मुख्य कार्यकारी अधिकारी किंवा कार्यालय प्रमुख यांनी मध्यवर्ती कार्यालयास व संबंधीत मुख्य अभियंता यांच्याकडे पुढील कार्यवाहीसाठी सादर करावा.

१०.  संबंधित अधिकाऱ्यांनी उमेदवार रुजू झाल्यानंतर त्यांची वैयक्तिक माहिती आवश्यक त्या प्रमाणपत्रांच्या प्रतीसह (२ प्रती) शासन ज्ञापन, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक सीआरएफ १२६५/ डी-१/२९/११/६५ अनुसार मध्यवर्ती कार्यालयास पाठवावी.

११.  वरील उमेदवार ज्या दिवशी रुजू होतील त्या दिवसापासून नियमाप्रमाणे त्यांचे मुल्यनिर्धारण अहवाल लिहिण्यात यावेत व बदली झाल्यास ते संबंधित अधिकाऱ्याकडे पाठवून विभाग प्रमुखांनी याबाबत संबंधित मुख्य अभियंता/अधीक्षक अभियंता व मध्यवर्ती कार्यालयास कळवावे.

१२.  संबंधित अधीक्षक अभियंतांनी वरील उमेदवारांचा परिविक्षाधीन कालावधी संपण्याच्या एक महिना अगोदर त्यांचे परिविक्षाधीन काळातील विशेष मुल्यनिर्धारण अहवाल शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक एसआरव्ही १०६२/डी, दिनांक २६/४/६२ मध्ये विहित केलेल्या नमुन्यात तीन प्रतीमध्ये मध्यवर्ती कार्यालयास पाठवावेत.

१३.  वरील उमेदवार जर शासनाच्या इतर विभागात काम करीत असतील तर संबंधित नियंत्रक अधिकाऱ्यांनी त्यांना नेमणूकीचे ठिकाणी हजर होण्याच्या दृष्टीने सदर सेवेतून कार्यमुक्त झाल्याचे अथवा तसे लेखी पत्र संबंधित मुख्य अभियंता/अधीक्षक अभियंता किंवा कार्यालय प्रमुख यांना सादर केल्याशिवाय त्यांना रुजू करुन घेता येणार नाही.

१४.  सदर उमेदवारांची ज्येष्ठता शासन अधिसूचना सामान्य प्रशासन विभाग क्रमांक एसआरव्ही १०७६/१२, दि.२१.६.१९८२ अन्वये विनियमित केलेल्या महाराष्ट्र नागरी सेवा (ज्येष्ठतेचे विनियमन) नियम, १९८२ मधील तरतुदीनुसार महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या गुणवत्ता क्रमांकानुसार निश्चित करण्यात येईल.

१५.  वित्त विभाग, शासन निर्णय क्र.अंनियो १००५/१२६/सेवा-४, दि.३१/१०/२००५ अन्वये उमेदवारांना नविन परिभाषीत अंशदान निवृत्तीवेतन योजना लागू राहिल, भ.नि. निधी योजना त्यांना लागू होणार नाही.

१६.  वरील उमेदवारांपैकी सेवेत रुजू होईल त्यांचे बाबतचा अहवाल तसेच सदर उमेदवार रुजू होणार नसेल तर परिच्छेद ९ येथे नमूद केल्याप्रमाणे प्रशिक्षणार्थीकडून घेतलेले बंधपत्र संबंधीत कार्यालयाने तात्काळ मध्यवर्ती कार्यालयास सादर करावे.

१७.  तसेच प्रशिक्षणा दरम्यान प्रशिक्षणार्थीकडून प्रबोधिनीच्या प्रशिक्षणबाबतच्या नियमांचे व शिस्तीचे काटेकोरपणे पालन करण्यात यावे. त्यांच्याकडून नियमभंग झाल्यास प्रबोधिनीकडून त्यांच्याविरुध्द शिस्तभंगाची कार्यवाही करण्यात येईल.

१८.  वरील उमेदवारांनी विहित परीक्षा नियुक्तीचे कार्यालयात रुजू झाल्याचे दिनांकापासून तीन वर्षाचे आंत उत्तीर्ण होणे बंधनकारक आहे. विहित कालावधीमध्ये विहित परीक्षा उत्तीर्ण न झाल्यास किंवा कामाचा अपेक्षित दर्जा प्राप्त न केल्यास किंवा त्यांचे काम योग्य अथवा अनुरुप न आढळल्यास त्यांची नियुक्ती कोणतीही पूर्व सूचना न देता रद्द करण्यात येईल.

१९. विशिष्ट ठिकाणी पदस्थापना/ बदली/ नियुक्ती मिळविण्यासाठी खासदार/ आमदार/ लोकप्रतिनिधी/ खाजगी व्यक्ती किंवा संघटना यांचे मार्फत दडपण/ दबाव आणण्याचा प्रयत्न केल्यास संबंधित उमेदवारांविरुध्द महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपिल) नियम, १९७९ मधील तरतुदींनुसार शिस्तभंग विषयक कारवाई करण्यात येईल.

२०. वरीलपैकी ज्या उमेदवारांना जिल्हा परिषद येथे नियुक्ती देण्यात आली आहे. त्यांची नियुक्ती प्रतिनियुक्तीने परंतु प्रतिनियुक्ती भत्याशिवाय राहील. प्रतिनियुक्तीच्या अटी व शर्ती सोबत जोडल्या आहेत. त्यांची प्रतिनियुक्ती प्रतिनियुक्ती

( संतोष कुमार ) भा.प्र.से

**सदस्य सचिव**

**प्रत :-** मा.प्रधान सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, मंत्रालय, मुंबई, यांना सविनय सादर.

**प्रत:-** खाजगी सचिव, (मा.मंत्री, पापु. व स्व.वि. यांचे कार्यालय) मंत्रालय, मुंबई यांना माहितीसाठी.

**प्रत :-** सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई यांना त्यांचेकडील गोपनीय पत्र क्र.३४७(२) दोन/ (अेइइ-आर) २०१३/१४-ब दिनांक २८ एप्रिल,२०१६ च्या अनुषंगाने सविनय सादर.

**प्रत माहिती व पुढील कार्यवाहीसाठी :**

१. संचालक (तांत्रिक), महाराष्ट्र जीवन प्राधिकरण एक्सप्रेस टॉवर्स, मुंबई यांना माहितीसाठी.
२. मुख्य अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण प्रादेशिक विभाग, नाशिक/ औरंगाबाद/ अमरावती/ नागपूर
३. संचालक (वित्त), महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, सिडकोभवन (दक्षिण कक्ष), नवीमुंबई.
४. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, गडचिरोली / अमरावती / जळगांव

**सोबत :- प्रतिनियुक्तीच्या अटी व शर्ती**

५. अधीक्षक अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण मंडळ, नाशिक/ औरंगाबाद/ अमरावती/ चंद्रपूर क्षेत्रीय स्तरावरील प्रशिक्षण, अधीक्षक अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, संशोधन व प्रशिक्षण केंद्र, नाशिक यांच्या मार्गदर्शनानुसार देण्यात यावे. पहिल्या महिन्यातील प्रशिक्षण विषयक बाबींचे मार्गदर्शन मुद्यांची प्रत सोबत जोडली आहे.
६. संचालक (प्रशासन) तथा अधीक्षक अभियंता, महाराष्ट्र पर्यावरण अभियांत्रिकी प्रशिक्षण व संशोधन संस्था (मीत्रा) , शासकीय पाणी पुरवठा केंद्राच्या आवारात, आय.एस.पी. रोड., डिस्टलरी इस्टेट, नाशिक रोड.
७. कार्यकारी अभियंता, म.जी.प्रा. विभाग, औरंगाबाद
८. कार्यकारी अभियंता, ग्रा.पा.पु.विभाग, जि.प., गडचिरोली / अमरावती / जळगांव
९. कार्यालयीन आदेशधारिका

**खालील प्रती रजिस्टर पोष्टाने पाठविणे**

१०. श्री. अर्जून मारुती गोळे, मु.पो.गवडी मधीलवाडी, ता.जावली, जि.सातारा-४१५०१२
११. श्री.गौरव तात्यासाहेब देवकर,
१२. श्री.उमल लक्ष्मण चांदेकर, ६९, जुना सुभेदार विस्तार, आनंद तृप्ती अपार्टमेंट, नागपुर-४४००२४
१३. श्री.प्रशांत जयसिंग पाटील, दत्त मंदीराजवळ, कापुसखेड नाका, इस्लामपुर, ता.वाळवा, जि.सांगली ४१५४०९